MHST200000812020

**नि.दि.दा.क्र.३/२०२३ मधील निशाणी क्र.१२४ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.६ब जितेंद्रकुमार जनार्दन कुंडलकर यांचे निधन दि.१६.०६.२०२३ रोजी मरीआईचीवाडी, ता.खंडाळा येथे झाले आहे. सदर प्रतिवादी यांचे नावाचे पुढे 'मयत' असे लिहुन दावा नि.१ मध्ये तशी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. सदर प्रतिवादी क्रं.६ब हे अविवाहीत होते व त्यांना मुलबाळ नव्हते. त्यांचे भाऊ सदरकामी आधीच दाव्यात सामील आहेत. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तरी, दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्रं.६ब यांचे नावापुढे 'मयत' अशी दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्रं.४अ व ४ड यांनी नि.क्रं.१२७ वर म्हणणे देवुन अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारला. त्यांनी असे कथन केले की, सदरचा अर्ज कोणत्या तरतुदीप्रमाणे दिलेला आहे याचा खुलासा अर्जात केलेला नाही. सदर प्रतिवादी क्रं.६ब हे दि.१६.०६.२०२३ रोजी मयत झालेले असुन याकामी अबेटमेंटचा हुकूम होऊन सुमारे दोन वर्षे झालेली आहेत. सदर उशीराबाबत वादीने कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात नमुद केलेले नाही. तसेच कोणते प्रतिवादी हे प्रतिवादी क्रं.६ब चे वारस आहेत याचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

४. वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप, जाहीर ठराव व निरंतर ताकीद मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. अशी

दुरुस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. परंतु, सदर दुरूस्ती अर्ज वादी यांनी विलंबाने दाखल केलेला असल्याने त्यांचेविरुद्ध खर्चाच्या रकमेचा आदेश करणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज (नि.१२४) खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (पाचशे रुपये फक्त) प्रतिवादी क्रं.४अ व ४ड यांना दयावी.

३) वरील खर्चाची पुर्तता केलेनंतर वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.09.23 17:57:18 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : २३.०९.२०२५

( ए.ए.पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.